सी.बी.डी. पो.ठाणे नवी मुंबई

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

## (Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): नवी मुंबई

**P.S.**(ठाणे): सी बी डी बेलापूर

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0059

**Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 16/03/2023 23:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 06/03/2023
**Date To** ( दिनांक पर्यंत): 16/03/2023
**Time From** (वेळेपासून): 12:19 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 12:18 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 16/03/2023 **Time** (वेळ): 22:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 040

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 16/03/2023 23:09 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

दक्षिण, 0.3 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): सिडको कार्यालय,सीबीडी, नवी मुंबई येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): हिरामण वालक्या चिमणे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : वालक्या चिमणे

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1972

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुक्काम पोस्ट जुई कामोठे,ता पनवेल, ,जि रायगड,पनवेल,रायगड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | मुक्काम पोस्ट जुई कामोठे,ता पनवेल, ,जि रायगड,पनवेल,रायगड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8850369425

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री मुकुंद चंद्रकांत बंडा वर्ग 2 | | | 1. 328,नवघर ,साईबाबा मंदीराजवळ,,पोस्ट जेएनपीटी, जिरायगड ,उरण ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रू. 70,000/ ( त्यात2000 दराच्या 35 नोटा ) व 2,30,000/ च्या 2000 दराच्या एकुण 115 कलर झेराक्स नोटा | 300,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

300,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक 16/03/2023

मी हिरामण वालक्या चिमणे वय 51 वर्षे धंदा:- शेती, रा. मुक्काम पोस्ट जुई कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड मो. नं. 8850369425 समक्ष फिर्याद देतो की,

मी वरील नमुद पत्यावर कायमचा रहीवाशी असुन पारंपारीक पध्दतीने शेती व्यवसाय करतो. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पुनःर्वसन मध्ये आमच्या बाजुस असलेल्या ब-याच गावातील राहती घरे सिडकोने संपादीत केलेली आहेत. मुक्काम चिंचपाडा (मोठापाडा) ता. पनवेल, जि. रायगड येथील माझे परीचयाचे श्री. संतोष नामदेव डाकी यांचे राहते घर नं. 863 हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पुनःर्वसनामध्ये सन 2013 मध्ये भुसंपादीत केले आहे. त्याप्रमाणे सदर घराची मा. उप जिल्हाधिकारी, भुसंपादन मेट्रो सं्टर क्र. 1 पनवेल या कार्यालयीन आदेशाप्रमाणे दिनांक 11/12/2013 रोजी मोजणी होवून सदर घराची जागा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पात भुसंपादीत केली आहे.

श्री. संतोष नामदेव डाकी यांचे चिंचपाडा (मोठापाडा) वडघर ग्रामपंचायत, ता. पनवेल जि.रायगड येथील राहते घर नं. 863 हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पात भुसंपादीत केल्यानंतर संबधीत मिळकत क्र. CHI-MO-01 मध्ये केलेल्या मोजणी प्रमाणे सदरचे घर हे 35X70 चौ. फुट असल्याने त्याबदल्यात सिडको कडुन पात्रता मंजुर होणेकामी, श्री. संतोष नामदेव डाकी यांनी सिडको कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला होता. त्याप्रमाणे श्री. संतोष डाकी हे पाठपुरावा करीत होते. परंतु श्री. डाकी यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांना पाठपुरावा करणे शक्य होत नव्हते. त्यामुळे त्यांनी सदर काम करणेबाबत माझेशी बोलणी केली असता त्यांना मी मदत करण्याचे ठरविले. श्री. संतोष नामदेव डाकी व त्यांची पत्नी सौ. स्वाती संतोष डाकी यांनी मला सदर काम पुर्ण करून घेण्यासाठी कोणत्याही प्रकारे कायदेशीर अडथळा निर्माण होवू नये याकरीता दिनांक 13/08/2022 रोजी विशेष अखत्यारपत्र (नोटरी श्रीमती पल्लवी अ. मानकर, पनवेल) यांचे समक्ष करून दिले. त्याप्रमाणे श्री. संतोष नामदेव डाकी यांना त्यांच्या भुसंपादीत केलेल्या घराच्या बदल्यात पात्रता मिळणेकामी, मी स्वतः नवी मुंबई आंतरराष्ट्रीय, पुनःर्वसन विमानतळ, सिडको कार्यालयाशी संपर्क साधुन आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली आहे.

दिनांक 01/03/2023 रोजी मी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय, पुनःर्वसन विमानतळ, सिडको कार्यालयातील मुख्य भुमि व भुमापन कार्यालयामध्ये श्री. संतोष नामदेव डाकी यांना त्यांच्या भुसंपादीत केलेल्या घराच्या बदल्यात पात्रता मिळणेकामी विचारणा करणेस गेलो असता, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय, पुनःर्वसन विमानतळ चिंचपाडा गाव परीसराचे विभागीय अधिकारी श्री. मुकुंद बंडा व भुमापक अधिकारी श्री. मनोज यांना भेटलो असता त्यांनी मला सांगीतले की, ''श्री. संतोष नामदेव डाकी यांची पात्रता फाईल मुख्य भुमि व भुमापन अधिकारी श्री. उमेश पोटे यांचेकडे आहे, सदर पात्रता मंजुरी आदेशावर सही करण्यासाठी मुख्य भुमि व भुमापन अधिकारी श्री. पोटे यांना पैसे दयावे लागतील तरच ते सही करतील नाही तर ते तुमची पात्रता मंजुर होणार नाही, पोटे साहेबांशी त्याबाबत त्यांचे बोलणे झालेले आहे.'' असे बोलले असता त्यावेळी मी, श्री. बंडा व श्री. मनोज यांना श्री. पोटे यांना नेमके किती पैसे दयावे लागतील असे विचारले असता भुमापक अधिकारी श्री. मनोज यांनी सांगीतले की, तुमची पात्रता खुपच मोठी आहे, त्यासाठी

कऱणार आहेत असे सांगीतले.

दिनांक 13/03/2023 रोजी लाचेच्या मागणीच्या पडताळणी करणे आवश्यक असल्याने मी पुन्हा व्हाईस रेका ॅर्डरसह पंच साक्षीदार क्र. 1 श्री जठार यांचेसोबत सिडको भवन कार्यालय येथे विमानतळ पुनःर्वसन विभाग येथे 12.35 ते 13.22 वाजताच्या दरम्यान लोकसेवक श्री. बंडा तसेच त्यांचे सह अधिकारी श्री. मनोज व श्री. वैती यांची भेट घेवून चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक श्री. बंडा यांनी श्री. संतोष डाकी यांना मिळणा-या भुखंडची पात्रता मिळणेकरीता "पर प्ला ॅट एक लाख रूपये म्हणजे सात लाख रूपये होतात.." असे सांगुन सदरची रक्कम स्वतःसाठी तसेच त्यांचे सहकारी श्री. मनोज व श्री. वैती असे तिघांकरीता दयावे लागतील असे सांगून सात लाख दयाचे....म्हणजे एकदम दयाचे नाही ते....अर्धे आता दयाचे अर्धे नंतर दयाचे.....असे बोलले. त्यावेळी मी त्यांना लोकसेवक श्री. पोटे साहेबांना किती पैसे दयावे लागतील बाबत विचारणा केली असता, श्री. बंडा यांनी मला असे सांगीतले की, पोटे साहेबांना मी मनोजला सांगतो....मनोजला बोलतो....मीच साहेबांना बोलतो...अस अस काम आहे...तुमचं काय आहे ते क्लीयर कट्ट सांगा.... असे मला बोलून नेमकी किती रक्कम दयावी लागेल, याबाबत उदईक रोजी सांगतो. तुम्ही उदया आफिसला या असे मला सांगीतले. त्यादरम्यान मी लोकसेवक श्री. पोटे यांची त्यांचे केबीनमध्ये जावुन भेट घेतली व त्यांचेकडे पात्रताधारक शेतकरी श्री संतोष डाकी यांचे प्रकरण मान्यतेबाबत चौकशी केली. त्यावेळी लोकसेवक श्री. पोटे यांनी सदरचे प्रकरण मान्यता मिळणेकरीता पाठविण्यात आले असुन, त्यापैकी ए ँशी टक्के जागा ही विमानतळ पुनःर्वसन विभाग व वीस टक्के जागा ही महामार्गामध्ये जात असल्याने, सबंधीत विभागाकडुन मान्यता मिळाल्याशिवाय पात्रते सबंधी काहीही सांगु शकत नाही असे सांगीतले. संबधीत विभागाकडुन मान्यता आल्यानंतर आमचे कार्यालयाकडुन तुम्हाला कळविण्यात येईल तेंव्हा तुम्ही या मग आपण पात्रता प्रकरणाचे अनुशंगाने चर्चा करू असे श्री.उमेश पोटे यांनी सांगीतले.

सदरचा पुढील उर्वरित जबाबत हा शब्दांची मर्यादा असल्याकारणाने टेक्स फाईल मध्ये अपलोड करण्यात आला. आहे. दिनांक 13/03/2023 रोजी लाचेच्या सत्यता पडताळणी भेटी दरम्यान श्री. मुंकुद बंडा यांनी मला सांगितले होते की, मुख्य भुमि व भुमापन अधिकारी उमेश पोटे यांचेशी लाचेच्या रक्कमेसबंधाने श्री. बंडा हे स्वतः त्यांचे सहअधिकारी श्री. मनोज यांचे मार्फतीने मुख्य भुमि व भुमापन अधिकारी उमेश पोटे यांचेशी बोलणी करणार असून त्यासाठी दिनांक 14/03/2023 रोजी प्रत्यक्ष भेटण्यास श्री.बंडा यांनी सांगीतले होते. त्याप्रमाणे लोकसेवक श्री बंडा यांनी मुख्य भुमि व भुमापन अधिकारी उमेश पोटे यांचेशी लाचेच्या रक्कमे संदर्भात बोलणी केली अगर कसे? याबाबत पडताळणी करणेकामी मी दिनांक 14/03/2023 रोजी 15 ::09 वा ते 16 ::19 वाजे दरम्यान डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डरसह पंच साक्षीदार यांचेसमवेत सिडको कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी लोकसेवक श्री.पोटे यांचे केबीनच्या बाहेर मला लोकसेवक श्री. मनोज हे दिसले. मी त्यांना भेटण्यासाठी विचारले असता त्यांनी काम असल्याचे सांगुन भेटण्यास नकार दिला. त्यांनतर मी लोकसेवक श्री. वैती यांची भेट घेवुन, त्यांचेशी प्रकरणाच्या अनुशंगाने चर्चा केली. त्यानंतर काहीवेळाने लोकसेवक श्री. बंडा हे त्यांचे केबीनमध्ये आले. त्यानंतर बंडा यांनी मला बाजुला नेवून पात्रता भुखंडाच्या अनुशंगाने चर्चा करून, साहेबं ाच तुम्ही बघुन घ्या तुमच्या लेवल ला... असे बोलून सदर कामासाठी माझेकडे पुर्वीप्रमाणेच एकुण सात लाख रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून, तुम्ही आता चार दया....बाकीचे नंतर दया मी सांगेन तेव्हा....काम होईल तेव्हा दया.... असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना चार नाही तीन देतो असे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक श्री.बंडा यांनी चार करा.... हीशोबाने घेता येईल काहीतरी....तीन माणस आहेत ना...चार देउन टाका.. तुम्हाला परत यायची गरज नाही... असे सागीतले. त्यावर मी त्यांना चार नाही... तुम्हाला तीन देतो...कधी देउ असे विचारले असता लोकसेवक श्री. बंडा यांनी आता द्या संध्याकाळ पर्यंत असे सागीतले. त्यावेळी मी त्यांना परवा देतो असे सांगीतले. त्यावर लोकसेवक श्री. बंडा यांनी परवा सकाळी दया असे सांगुन त्यांचा मोबाईल क्रमांक 9930654602 असा दिला. त्यानंतर मी लोकसेवक श्री. मनोज यांना भेटण्यासाठी विचारले असता त्यांनी कामाकरीता बाहेर जात असल्याचे सांगुन भेटण्यास नकार दिला.

एकंदरीत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. बंडा यांनी स्वतःकरीता तसेच लोकसेवक श्री. मनोज व श्री. वैती असे तिघांकरीता एकुण रूपये सात लाख लाचेची मागणी करून, मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी पहिला हप्ता म्हणुन रूपये तीन लाख लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निश्पन्न झाल्याने सदर मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांनी मला दिनांक 16/03/2023 रोजी सकाळी सिडको भवन, सीबीडी, नवी मुंबई कार्यालय येथे घेवुन येण्यास सांगीतल्याने त्याप्रमाणे दिनांक 16/03/2023 रोजी पुढील लाचेची सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

त्याप्रमाणे दिनांक 16/03/2023 रोजी अ ेसीबी नवी मुंबई कार्यालयात मला सापळापुर्व कार्यवाहीची माहिती देवुन सापळापुर्व कार्यवाही पुर्ण करून लाचेच्या सापळा कारवाईचे अनुषगाने मला, पंचाना तसेच सापळा पथकास पो.

उप अधीक्षक श्रीमती ज्योती देशमुख यांनी योग्य त्या सुचना दिल्या. सापळापुर्व कारवाई दरम्यान मी हजर केलेली लाचेची रक्कम रू. 70,000/- (त्यामध्ये 2000 दराच्या 35 भारतीय चलनी नोटा ) तसेच 2,30,000/- च्या 2000 दराच्या एकुण 115 कलर झेराॅक्स असलेल्या नोटां एका लिफाफ्यामध्ये ठेवुन सदरचा लिफाफा माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशामध्ये ठेवला.

त्यानंतर लोकसेवक श्री.बंडा हे कार्यालयात हजर आहेत का ? हे विचारण्यासाठी त्यांना माझे मोबाईल नंबर 8850369425 वरून लोकसेवक श्री.बंडा यांचे मोबाईल क्रमांक 9930654602 वर फोन केला असता त्यांचा फोन लागला नाही व संपर्क झाला नाही. त्यानंतर मी लाचेची रक्कम घेवून पंच साक्षीदार यांचेसमवेत सिडको कार्यालयात विमानतळ पुनःर्वसन विभाग येथे जावून लोकसेवक श्री.बंडा यांचे केबीनचे ठिकाणी गेलो असता सदर ठिकाणी लोकसेवक श्री.बंडा उपस्थित नव्हते म्हणून मी त्यांचे केबीनमध्ये थांबून राहीलो. त्यावेळी मला लोकसेवक श्री.वैती हे भेटून आज सकाळीच आले असे विचारले त्यावर मी त्यांना 'हो' बोललो. त्यानंतर लोकसेवक मनोज हे भेटले व त्यांनीच हातानेच मला नमस्कार केला. त्यानंतर काहीवेळाने लोकसेवक श्री. बंडा सदरठिकाणी आले. त्यावेळी मी त्यांना लाचेची रक्कम तीन लाख रूपये घेवून आलो असून पुढील काम जलदगतीने करण्याबाबत विनंती केली असता लोकसेवक श्री.बंडा हे मला चार लाख रूपये आणण्यास संांगितले होते असे बोलले असता मी सध्या तीन लाख आणल्याचे त्यांना बोललो. त्यावेळी आपण कॅन्टीनला जावून बोलू असे मला लोकसेवक श्री.बंडा हे बोलले. म्हणून मी, पंच श्री.जठार व लोकसेवक श्री.बंडा असे सिडको कार्यालयातील तळमजल्यावर असलेल्या कॅन्टीनमध्ये जावून बसलो. सदरठिकाणी लोकसेवक श्री.बंडा यांनी हातात आणले आहेत की पिशवीत असे मला विचारले असता मी त्यांना लिफाफामध्ये तीन लाख रक्कम आणले असल्याचे सांगितले.त्यावेळी मी लाचेच्या रक्कमेचा लिफाफा देण्यासाठी खिशात हात घालत असतान त्यांनी इथे नको असे मला बोलले. त्यानंतर चहा घेवून झाल्यानंतर आम्ही पुन्हा लोकसेवक श्री.बंडा यांचे केबीनमध्ये आलो. त्यावेळी लोकसेवक श्री. बंडा यांनी लाचेच्या रक्कमेचा लखोटा त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे काळ्या रंगाच्या सॅकमध्ये ठेवला. त्यानंतर काहीवेळाने मी माझे डोळयांना लावलेला चष्मा काढुन लाच स्विकारल्याबाबत सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर लोकसेवक श्री. मुकंुद बंडा यांना सापळा पथकाने लाचेच्या रक्कमेसह 12ः18 वा. रंगेहात पकडले.

त्यानंतर आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द सिडको कार्यालय, नवी मुंबई येथे सापळा पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आली.

तरी यातील लोकसेवक श्री मुकूंद चंद्रकांत बंडा (वर्ग 2), वय 57 वर्षे , क्षेत्रअधिकारी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडको, नवी मुंबई राहणार मुक्काम नवघर घर नंबर 328, पोस्ट जेएनपीटी, साईबाबा मंदीराजवळ, ता. उरण जि.रायगड यांनी त्यांचे शासकीय पदाचा दुरूपयोग करून, दिनांक 06/03/2023, दिनांक 13/03/2023 व दिनांक 14/03/2023 रोजीच्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पुनःर्वसन मध्ये शेतकरी श्री.संतोष डाकी यांचे संपादित केलेल्या घराच्या बदल्यात सिडकोकडून त्यांना मिळणा-या भुखंडाची पात्रता निश्चीत करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याकरीता स्वतःसाठी तसेच लोेकसेवक श्री. मनोज पाटील व लोकसेवक श्री. सचिन वैती यांचेकरीता माझेकडून एकूण सात लाख रूपयांची मागणी करून, दिनांक 16/03/2023 रोजी पहिला हप्ता रू.3,00,000/- सिडको कार्यलय, सीबीडी नवी मुंबई येथे 12ः18 वाजता स्विकारला असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणून माझी श्री मुकूंद चंद्रकांत बंडा (वर्ग 2), वय 57 वर्षे क्षेत्रअधिकारी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडको, नवी मुंबई राहणार मुक्काम नवघर घर नंबर 328, पोस्ट जेएनपीटी, साईबाबा मंदीराजवळ, ता.उरण जि.रायगड यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मी वाचुन पाहीला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

हे लिहून दिले सही

समक्ष

दिनांक 16/03/2023

(ज्योती देशमुख)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
parag shankar londhe
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): DGPPSLM8704
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

ebimane

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे
नवी मुंबई

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): GIRIDHAR SITARAM
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: *Physical features, deformities and other details of the (If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**